दैनिक


अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १३७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२९ डिसेंबर २०२४


## अभिमानास्पद! भारतीय लष्कराने चीनच्या सीमेलगत उभारला छत्रपती शिवरायांचा पुतळा !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, लडाख :** छत्रपती शिवाजी महाराज हे लाखो लोकांचे प्रेरणास्थान आहेत. देशभरात त्यांना मानणार तसेच त्यांचा आदर्श घेणारा मोठा वर्ग आहे. यादरम्यान भारतीय लष्कराने पूर्व लडाखमध्ये भारत चीन सीमेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला असून नुकतेच या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. हा पुतळा चीनबरोबरच्या सीमेवरील वास्तविक नियंत्रण रेषेच्या जवळ पँगॉन्ग तलावाच्या किनार्यावर १४,३०० फुट उंचीवर उभारण्यात आला आहे. लष्कराच्या लेह येथील १४ कॉर्प्सने यासंबंधी माहिती दिली आहे. १४ कॉर्प्स (फायर अँड फ्यूरी कॉर्प्स)चे जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टनंट जनरल हितेश भल्ला यांनी या पुतळ्याचे गुरूवारी (२६ डिसेंबर) रोजी अनावरण केले.

पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमाचा व्हिडीओ देखील शेअर करण्यात आला आहे. २६ डिसेंबर २०२४ रोजी, १४,३०० फूट उंचीवर पँगॉन्ग त्सो च्या काठावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. शौर्य, दूरदृष्टी आणि दृढ न्यायाचे प्रतीक असलेल्या या पुतळ्याचे उद्घाटन हे लेफ्टनंट जनरल हितेश भल्ला, एससी, एसएम, व्हीएसएम, जीओसी फायर अँड फ्युरी कॉर्प्स आणि द मराठा लाइट इन्फंट्री यांच्या हस्ते करण्यात आले. अशी माहिती फायर अँड फ्युरी कॉर्प्सकडून देण्यात आली आहे. एएनआय वृत्तसंस्थेने पुतळ्याच्या अनावरण करतेवेळीचा व्हिडीओ देखील शेअर केला आहे. ज्यामध्ये शिवरायांच्या पुतळ्यावरील कापड उचलले जाताना दिसत आहेत. याबरोबरच पुतळ्याशेजारी भगवा ध्वज देखील फडकताना पाहायला मिळत आहे. भारत आणि चीनने डेम चोक आणि डेपसांग भागातून सैन्य मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याच्या काही दिवसांनंतर लगेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. २१ ऑक्टोबर रोजी झालेल्या करारानंतर, भारत आणि चीन या देशांनी सैन्य मागे घेण्याचे काम पूर्ण केले आहे. पूर्व लडाखमध्ये ५ मे २०२० रोजी पँगॉन्ग लेक परिसरात हिंसक संघर्ष झाला होता, यानंतर दोन्ही देशांमध्ये दीर्घकाळ चाललेल्या लष्करी आणि राजकीय चर्चांनंतर वाद असलेल्या भागातून दोन्ही बाजूंनी सैन्य मागे घेण्याचा निर्णय घेतला.

## दिवा शहरात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे मोफत शिबिराचे आयोजन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, दिवा (ठाणे) :** शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे दिवा शहर आयोजित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे मोफत शिबिराचे आयोजन शहर प्रमुख सचिन पाटील, माजी नगरसेविका अंकिता पाटील, युवासेना शहर अधिकारी अभिषेक ठाकुर, विभाग संघटीका मयुरी पोरजी यांच्या मार्फत साबे चौक येथे करण्यात आले आहे. तरी त्या शिबिरास शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. या कार्यक्रमाला उपशहरप्रमुख तेजस पोरजी, विधानसभा संघटीका योगिता नाईक, शहर संघटीका ज्योती पाटील , शहर समन्वयक प्रियांका सावंत, उपशहर संघटीका स्मिता जाधव, तृप्ती पाटील तसेच विभाग प्रमुख, शाखा प्रमुख व सर्व पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.हे शिबिर आजपासून २८ डिसेंबर ते ३० डिसेंबर पर्यंत ठेवण्यात आले आहे.तरी या योजनेचा लाभ दिवेकर नागरिकांनी जास्तीत जास्त घ्यावा असे आवाहन शहरप्रमुख सचिन पाटील यांनी केले.

## वन्य प्राण्यामुळे, शेतकरी वर्ग त्रस्त!



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२८, सुपा (अहिल्यानगर) :** सूपा परिसरातील रायतळे, अस्तगाव, पिंपरी गवळी, रांजणगाव रोड येथील ज्वारी हरभरा गहू भुईमूग ही पिके हरीण व रानडुक्कर या वन्यप्राण्यांनी खाऊन फस्त केल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात लागवड केलेल्या मका पिकाचे वन्यप्राणी कुरतडून मोठे नुकसान करत आहेत. गतवर्षी पावसामुळे आम्हा शेतकर्यांचे कंबरडे मोडले होते. त्यात आणखी समस्या वाढली असून, वन्य प्राण्यांचा हैदोस वाढला आहे. वन विभागाकडून या प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी परिसरातील शेतकरी रविंद्र बांदल व स्थानिक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.काही शेतकऱ्यांच्या जमिनी ह्या वन क्षेत्राला लागून आहे त्यामध्ये कोणतेही पीक घेतले तरी ते पीक हरण इतर वन्य प्राणी खाऊन टाकतात त्यामुळे शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळत नाही. यामध्ये लक्ष घालून काहीतरी उपाययोजना कराव्यात असे स्थानिक शेतकऱ्यांचे मत आहे.

## बीड, परभणीत रस्त्यावर गुंडागर्दी स्पष्ट - बच्चू कडूंची टीका



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, अमरावती :** बीड आणि परभणी येथील घटनांमध्ये रस्त्यावरील आणि खाकीतील गुंडागर्दी स्पष्टपणे दिसून येत आहे, अशी टीका म ाजी आमदार बच्चू कडू यांनी महायुती सरकारवर केली आहे. मस्साजोग येथील दिवंगत माजी सरपंच संतोष देशमुख आणि परभणी मधील दिवंगत सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी अमरावती शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ विविध संघटनांच्या वतीने एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात माजी आमदार व प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी सहभाग घेतला. दरम्यान, बच्चू कडू यांनी राज्य सरकारवर सडकून टीका करत सरकारला आव्हान दिले. बच्चू कडू म्हणाले, सत्तेपुढे शहाणपणा चालत नाही अशी म्हण आपल्याकडे आहे. माझे मुख्यमंत्र्यांना आव्हान आहे की, ही म्हण खरी ठरायला नको असेल तर अतिशय स्वच्छपणे कारवाई झाली पाहिजे. कारवाई करायची नसेल तर स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, होय ते आमचे गुंड आहेत. या दुर्देवी घटनांवर पारदर्शकपणे कारवाई होणे आवश्यक आहे. सत्य महत्त्वाचे असते, सत्ता म हत्त्वाची नसते, हे लोकांना सांगणे गरजेचे आहे. नाहीतर याचे मोठे परिणाम उद्या सरकारला भोगावे लागतील, असा इशारा बच्चू कडू यांनी सरकारला दिला. बच्चू कडू यांनी आता थेट आंदोलनात उडी घेत मस्साजोग आणि बीड येथील घटनेवरून सरकारला लक्ष्य केले आहे. दुसरीकडे शेतकरी कर्जमाफी आणि मेंढपाळांना न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे. बच्चू कडू हा पराभवाने खचून जाणारा नाही आणि हिंमतीनेही खचलो नाही, असे बच्चू कडू म्हणाले होते. बच्चू कडू यांचा विधानसभा निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात ते मंत्री होते. महायुती सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर त्यांचे मंत्रिपद गेले. महायुतीत असूनही त्यांनी विरोधी भूमिका घेत प्रहार पक्षातर्फे निवडणूक लढवली. निवडणुकीपूर्वी त्यांनी तिसरी आघाडी स्थापन केली होती, पण तिसऱ्या आघाडीचे आणि त्यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वच उमेदवार पराभूत झाले. त्यामुळे आता बच्चू कडू कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. कदाचित मी आंदोलक म्हणून लोकांना जास्त आवडत असावा, म्हणूनच त्यांनी आपल्याला यावेळी पराभूत केले असावे, असे ते मिश्किलपणे काही दिवसांपूर्वी म्हणाले होते.

## 'महादेव ॲप'मधून ९ अब्ज रकमेचा व्यवहार; सुरेश धस यांचा आरोप



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, छ.संभाजीनगर :** दोन दिवसांपूर्वी मंत्रीपदच भाड्याने दिल्याचा आरोप केल्यानंतर भाजपचे आमदार सुरेश धस यांनी अप्रत्यक्षपणे धनंजय मुंडे यांना लक्ष्य केले. बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाबाहेर माध्यमांशी बोलताना आमदार धस यांनी अत्यंत गंभीर आरोप केले.

एकाच व्यक्तीच्या खात्यावर महादेव ॲपच्या माध्यमातून तब्बल ९ अब्ज रकमेचा व्यवहार झाला आहे. यासंदर्भाने दोन अधिकाऱ्यांचीही नावे पोलीस अधीक्षकांना दिली असून, त्याची लिंक मलेशियापर्यंत असल्याचे धस यांनी सांगितले.धनंजय मुंडे यांनी गुरुवारीच मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांची भेट घेऊन त्यांच्यावर होणाऱ्या आरोपांविषयीची बाजू मांडली. मुंडे हे सध्या बीडचे पालकमंत्रीपद मिळवण्याच्या प्रयत्नात असल्याच्या चर्चेवरून धस यांनी त्यांना लक्ष्य करत, तुम्हाला तुमचे पालकमंत्रिपद लखलाभ राहो, असे सांगत त्यांच्यावर विविध आरोप केले. परळीत राख माफियांचेही थैमान असून, यामागे कोण आहे, हे समोर आले पाहिजे, असेही ते म्हणाले. वेगवेगळ्या तारांकितांना आणून नाचवण्याचा 'परळी-पॅटर्न' असल्याचाही आरोप धस यांनी केला.

पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन त्यांना पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांची बिंदूनामावलीप्रमाणे यादी देण्याची विनंती केली आहे. शनिवारच्या मोर्चामध्ये विविध जाती, धर्मातील नागरिक सहभागी होतील, असेही ते म्हणाले.बीडमध्ये आज मूक मोर्चा -छत्रपती संभाजीनगर :केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील प्रमुख आरोपींना अटक करावी, यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी बीडमध्ये शनिवारी सर्व संघटना, राजकीय पक्षांच्या नेत्यांचा सहभाग असलेला मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चास शरद पवार येतील असेही सांगण्यात येत होते. मात्र, त्यांच्या उपस्थितीबाबतच्या वृत्तास अधिकृत दुजोरा मिळू शकला नाही.म ोर्चाच्या संदर्भाने सोमवारी बीड शहरात आमदार संदीप क्षीरसागर आदींच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. मोर्चा काढण्याचा निर्णय मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केला होता. याम ध्येछत्रपती संभाजीराजे,खासदार बजरंग सोनवणे आदी सहभागी होतील, असे आमदार क्षीरसागर यांनी सांगितले. मोर्चाला विविध राजकीय, सामाजिक संघटनांचाही पाठिंबा मिळत आहे. मोर्चामध्ये व्यापारी, वकील, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक आदी संघटनांनी सहभागी होण्याचे आवाहन माजी राज्यमंत्री सुरेश नवले यांनी केले आहे.म ोर्चा सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, माळीवेस, अण्णा भाऊ साठे चौक, बस स्टँड,छत्रपती शिवाजी महाराजचौक ते पोलीस अधीक्षक कार्यालयापर्यंत काढण्यात येणार आहे.

## कोल्हापूरकरांकडून डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्याचा गौरव; सर्वपक्षीयांची श्रद्धांजली...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, कोल्हापूर :** माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांना सर्वपक्षीय नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली. बुद्धिमान अर्थतज्ज्ञ हरपल्याची भावना व्यक्त करण्यात आली.इचलकरंजी काँग्रेस भवनात डॉ. सिंग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. शहराध्यक्ष संजय कांबळे, प्रदेश सचिव शशांक बावचकर, राहुल खंजीरे, मदन कारंडे, सागर चाळके, अजित जाधव, प्रकाश मोरबाळे, उदयसिंह पाटील, भरमा कांबळे उपस्थित होते.

**आर्थिक स्थैर्य – सतेज पाटील**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाने अर्थतज्ज्ञ, नेतृत्व, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेचा आदर्श गमावला आहे. आधुनिक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आणि प्रगतीचा नवा अध्याय लिहिणारे डॉ. सिंग यांचे साधे राहणीम ान, वैचारिक बैठक प्रेरणादायी आहे, असे विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील यांनी म्हटले आहे.

**निष्णात अर्थतज्ज्ञ – धनंजय महाडिक**

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी एक निष्णात अर्थतज्ज्ञ म्हणून देशाला दिलेले योगदान कधीच विसरता येणार नाही. काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत आणि देशाच्या प्रगतिशील वाटचालीम ध्ये त्यांचे योगदान मोठे आहे, अशा भावना खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केल्या.

**सिंग शेतकऱ्यांसाठी किंग – राजू शेट्टी**

पुणे येथे तत्कालीन अर्थमंत्री मनम ोहन सिंग यांनी घेतलेल्या बैठकीस शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली सहभागी होण्याची संधी मला मिळाली. सरकारच काय, तर समाजही या शेतकऱ्यांचे देणे लागतो, असे मत त्यांनी व्यक्त केले होते.

ते पंतप्रधान असताना शेतकरी आत्महत्या व शेती व्यवसायातील अडचणी यावर उपाययोजना शोधण्यासाठी एम.एस.स्वामिनाथन शेतकरी आयोगाची स्थापना केली. मी लोकसभेचा सदस्य असताना साखर नियंत्रण कायद्यात त्यांनी रास्त दुरुस्ती केल्यानेच आज ऊस उत्पादकांना एफआरपी मिळत आहे. त्यांच्यामुळेच शेतकऱ्यांसाठी ७० हजार कोटींची कर्जमाफी झाली होती. साखर कारखानदार काटमारी करीत असल्याची तक्रार मी संसदेत मांडल्यावर त्यांनी खासदार निधीतून वजनकाटे बसविण्यास परवानगी दिली होती, असे माजी खासदार राजू शेट्टी यांनी सांगितले.

## शिक्षिकेकडून विद्यार्थ्यावर अत्याचार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** दहावीतील विद्यार्थ्यांवर शिक्षिकेने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) शिक्षिकेविरुद्ध खडक पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी शिक्षिकेला पोलिसांनी अटक केली.

याबाबत पीडित मुलाच्या आईने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पीडीत मुलगा एका शाळेत दहावीत आहे. शुक्रवारी तो शाळेत दहावीची पूर्वपरीक्षा देण्यासाठी आला होता. मुलगा शाळेत आल्यानंतर त्याच्या पालकत्वाची जबाबदारी शिक्षकांवर असते. शिक्षिकेने मुलाला प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्याच्यावर अत्याचार केले. शाळेच्या आवारात शिक्षिकेने मुलावर अत्याचार केले, अशी फिर्याद पीडित मुलाच्या आईने दिली आहे.

संपादकीय



## ध्रुवीकरणाने पछाडलेले जग

करोनामुळे जगाची विस्कटलेली घडी अद्याप सावरलेली दिसत नाही. २०२१ चे जागतिक वैशिष्ट्य होते अमेरिका-चीन व्यापार युद्धाची सुरुवात! २०२२ मध्ये रशियाचे युक्रेनवरील आक्रमण, २०२३ मध्ये हमासचा इस्रायलवरील हल्ला आणि इस्रायलने दिलेले प्रत्युत्तर. २०२४ कडे पाहताना असे जाणवेल की मानवी क्षमता जागतिक शांतता रुजविण्यास अपुऱ्या पडत आहेत. शांततेच्या शाश्वततेसाठी ज्या राजकीय व्यवस्था आपण उभ्या केल्या होत्या त्यांनाच तडे जाताना दिसत आहेत.

बांगलादेशचे अवलोकन केल्याससुद्धा ही गोष्ट लक्षात येईल की, आर्थिक प्रगतीच्या दिशेने दमदार वाटचाल करणारा हा देश अचानक अराजकतेच्या गर्तेत अडकला. २०२४ च्या शेवटी हे प्रकर्षाने जाणवेल की स्थैर्य हा केवळ कल्पनाविलास असून जागतिक पटलावर सर्वदूर, विकसित आणि विकसनशील या भेदापलीकडे, लोकशाही आणि हुकूमशाही या दोन्ही शासन पद्धतींमध्ये अस्थिरतेचे वारे जोमाने वाहताना दिसतात. फोफावलेला भू-राजकीय संघर्ष रशिया- युक्रेन युद्ध आणि इस्रायल- पॅलेस्टाइन संघर्ष हे गेल्या एक-दोन वर्षांपासून नियंत्रणात येण्याची चिन्हे नाहीत. युक्रेनमधील युद्धाची व्याप्ती यावर्षी वाढली. रशियाने मूलभूत पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. कीव्हसारख्या शहरांना सततच्या बॉम्बफेकीचा सामना करावा लागला, ज्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले आणि शेजारील देशांवर अधिक ताण आला. याचा प्रभाव अन्न आणि ऊर्जापुरवठ्यावर होऊन अस्थिरतेची झळ युरोपपलीकडेदेखील पोहोचली.

दुसरीकडे युक्रेनचे उच्चपदस्थ रशियन अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्याचे प्रयत्न धारदार झाले. पुतिन यांचे प्रत्युत्तर हे २०२५ च्या घडामोडींची दिशा ठरविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. गाझा संघर्षामध्ये न भूतो स्वरूपाची हानी होऊन ५० हजारांपेक्षा अधिक व्यक्तींचा मृत्यू झाला, लाखो लोक विस्थापित झाले. अन्न, औषधांच्या कमतरतेमुळे मानवतावादी संकट वाढले. आंतरराष्ट्रीय मध्यस्थीचे प्रयत्न फसले. जागतिक शक्तींचा संघर्ष निराकरणात कमी होत चाललेला प्रभाव दिसून आला. येमेन, सोमालिया, माली, सुदान यांच्या यादवीमध्ये काही परिणाम कारक घडले नाही, मात्र अमेरिका आणि रशिया यांच्याबरोबरच इराण, सौदीसारख्या शक्तींचा या स्थानिक संघर्षातील वाढता हस्तक्षेप आणि खासगी सैन्याचा वापर स्थानिकांची दैना अधिक तीव्र करणारा ठरला.

### सत्तापालट आणि लष्करी उठाव !

देशांतर्गत उठाव हे २०२४ चे प्रमुख वैशिष्ट्य म्हणता येईल. बांगलादेशचे उदाहरण तर आपण पाहिलेच! सीरियामध्ये, नुकत्याच झालेल्या लष्करी उठावाने देशाची आधीच अनिश्चित स्थिती अधिक गडद केली. अनेक वर्षांच्या गृहयुद्धानंतर, या बदलामुळे राष्ट्र उभारणीचे स्वप्न अनिश्चिततेच्या गर्तेत सापडले आहे. बोलिव्हियाने लॅटिन अमेरिकेतील लोकशाही संस्थांची असुरक्षितता अधोरेखित करणारा अयशस्वी बंडाचा प्रयत्न अनुभवला. जनरल जुआन जोसे झुनिगा यांनी सत्ता काबीज करण्याच्या अल्पायुषी प्रयत्नाने प्रदेशातील नागरी-लष्करी संबंध संतुलित करण्यासाठी चालू असलेल्या संघर्षांचे प्रदर्शन केले. कदाचित सर्वात धक्कादायक बाब म्हणजे दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांनी स्वत:विरुद्धच केलेला उठावाचा प्रयत्न! मार्शल लॉ घोषित करून आणि नॅशनल असेंब्लीला दडपण्याचा प्रयत्न करून यून यांनी सुस्थापित प्रणालींमध्येही लोकशाही राजवटीची ठिसूळता अधोरेखित केली. हे सत्तापालट काही तासांतच रद्द करण्यात आले, तरीही निर्माण झालेली राजकीय अव्यवस्था धक्कादायक आहे.

प्रस्थापित लोकशाहींनादेखील २०२४ मध्ये महत्त्वपूर्ण राजकीय आव्हानांना सामोरे जावे लागले. फ्रान्स पेन्शन सुधारणांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात होणाऱ्या निषेधाचे केंद्र ठरला. त्याची परिणती पंतप्रधानांच्या राजीनाम्यात झाली. त्याचप्रमाणे आर्थिक अस्थैर्य आणि वाढत्या उजव्या शक्तींमुळे जर्मनीचे युती सरकार अंतर्गत विभाजनांशी संघर्ष करत होते. मतभेद हाताबाहेर गेल्यानंतर शोल्झ सरकारविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर झाला. या अस्थिरतेचे जागतिक पातळीवर पडसाद उमटले. फ्रान्सच्या निदर्शनांमुळे युरोपीयन युनियनच्या धोरणनिर्मितीमध्ये व्यत्यय आला, तर जर्मनीच्या राजकीय अस्थिरतेमुळे युरोपमधील प्रमुख ताकद म्हणून आव्हानांना तोंड देण्याची नेतृत्वाची भूमिका कमकुवत झाली.


आर्थिक आव्हाने आणि हवामानाच्या धक्क्यांनी २०२४ ची संकटे आणखी वाढवली. युरोप आणि आशियाला आर्थिक स्थैर्य, उच्च चलनवाढ आणि मंदीच्या भीतीचा सामना करावा लागला. जर्मनीमध्ये घसरलेल्या औद्योगिक उत्पादनामुळे बेरोजगारी वाढली, युती सरकारबद्दल असंतोष वाढला. पेन्शन सुधारणांच्या विरोधात फ्रान्सच्या निषेधाचे मूळदेखील आर्थिक तक्रारींत होते. नागरिकांनी चांगले जीवनमान आणि समान धोरणांची मागणी केली होती. हवामान आपत्तींमुळे उपलब्ध नैसर्गिक संसाधनांवर ताण आला. तापमान वाढीमुळे दक्षिण आशियातील पूर, आफ्रिकेतील दुष्काळ तीव्र झाले. त्यांचे रूपांतर स्थलांतर आणि संसाधन संघर्ष धारदार होण्यामध्ये झाले.

# बॉलिवूडचे पाहिले सुपरस्टार राजेश खन्ना !!

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांचा आज जन्मदिन. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते.

ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट साबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धे करिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला.

या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले



होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

**बाबूमोशाय.....**

**बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा..**

**जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है..**

**कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता..**

**आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है**

**राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## नवी मुंबईला अमली पदार्थांचा विळखा

**नवी मुंबई :** ठाणे जिल्ह्यात अमली पदार्थां सदर्भातील गुन्ह्यांमध्ये वाढ होत असून जिल्ह्यातील नवी मुंबई शहराला अमली पदार्थांचा विळखा बसला आहे. या वर्षभरात अमली पदार्थांची ६५४ प्रकरणे समोर आली आहेत. २०२३ मध्ये अमली पदार्थांच्या गुन्ह्याचे प्रमाण ४७५ इतके होते. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत अमली पदार्थांच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याचे स्पष्ट होते. यावर्षी अमली पदार्थ संबंधातील गुन्ह्यांमध्ये ५८ विदेशी नागरिकांना अटक झाली. यातील बहुतांश आफ्रिकेतील आहेत. रेव्ह पार्ट्या किंवा इतर तस्करीच्या माध्यमातून अमली पदार्थ तरुण-तरुणींपर्यंत पोहचविले जातात. त्यामुळे या अमली पदार्थांच्या विळख्यात सर्वसामान्य घरामधील तरुण-तरुणी बळी पडत आहेत. नवी मुंबई शहरामध्ये यावर्षी अमली पदार्थ संदर्भात ६५४नोंद झाल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थांपैकी कोकेन हे सर्वाधिक किमतीचे आहे. यावर्षी १६ कोटी ७० लाख रुपयांचे कोकेन जप्त करण्यात आले असून, २०२३ मध्ये एक कोटी २५ लाख रुपयांचे कोकेन जप्त केले होते. तर १२ कोटी ६७ लाख रुपयांचे मफेड्रॉन जप्त करण्यात आले आहे.

### मूक..

बोलून जातो खूप
रे कधी मूक मोर्चा
काही ना करताचं
अधिक चाले चर्चा

आगळी प्रतिक्रिया
झणझणीत मिर्च्या
ताकद दिसते खरी
हलवूशकते खुर्च्या

मुखस्तंब प्रकरणां
फुटते सहज वाचा
मूक शब्दांत शक्ती
दणकट असे ढाचा

काळजात आरपार
घुसतो पुरता टोचा
लपलेल्या गुन्ह्याचा
बरोबर होतो लोचा

हवेकशास परिश्रम
प्रकाशा येतो सच्चा
आवळले जाईफास
अंधारातजरी लुच्चा

जबाबदारीने वागावे
उलटा घुसेल बोरचा
शांतमार्गी आंदोलन
विटा नकोत कच्च्या

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# प्रशासक ते पंतप्रधान : अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहनसिंह

**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नंतर सलग १० वर्षे पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी काम केले. २००४ मध्ये काँग्रेस पक्षाने यूपीए सरकार मध्ये त्यांना पंतप्रधान पदाचा बहुमान दिला, २००४ पासून २०१४ पर्यंत ते भारताचे पंतप्रधान होते. त्यानंतर सलग १० वर्ष त्यांनी पंतप्रधान म्हणून देशसेवा केली. भारताचे १४ वे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे एक विचारवंत व अभ्यासक म्हणून ओळखले जात होते. तसेच त्यांचा कामाप्रती असलेला व्यासंगी व शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे त्यांच्याकडे आदराने बघितले जात होते. मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. त्यांनी १९४८ साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व पंजाब विद्यापीठापासून इंग्लंड मधील केम्ब्रिज विद्यापीठा पर्यंत विस्तारलेले होते. १९५७ साली त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर १९६२ साली त्यांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी.फील संपादन केली. त्यांचे 'इंडियाज एक्स्पोर्ट ट्रेंड्स एण्ड प्रोस्पेक्ट्स फोर सेल्फ ससटेन्ड ग्रोथ' हे पुस्तक भारताच्या अंतस्थ व्यापारी धोरणाची समीक्षा करणारे आहे.

डॉ. मनमोहन सिंह हे काँग्रेस पक्षाचे सदस्य असून राज्यसभेत आसामचे प्रतिनिधित्व करीत होते. यापूर्वी ते १९९१ साली पी.व्ही. नरसिंहराव यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय अर्थमंत्री होते. त्या काळात त्यांनी केलेल्या आर्थिक सुधारणा आणि त्यानंतर झालेल्या आर्थिक प्रगतीमुळे त्यांची कार्यक्षम राजकारणी म्हणून प्रतिमा बनली आहे. मनमोहनसिंहांच्या वडिलांचे नाव गुरुमुखसिंह आणि आईचे नाव अमृतकौर. मनमोहनसिंह हे अर्थशास्त्रात उच्चशिक्षित होते. संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार आणि विकास विभागात काम करीत असतांना, भारताचे तत्कालीन विदेश व्यापारमंत्री ललित नारायण मिश्रा यांनी मनमोहनसिंहांची आपल्या खात्यात सचिव म्हणून नियुक्ती केली होती. पंजाब विद्यापीठ व प्रथितयश दिल्ली स्कूल ऑफ इकोनोमिक्स मध्ये प्राध्यापक म्हणून काम करत असताना त्यांची शैक्षणिक ओळख अधिक समृद्ध झाली. या काळात युएनसीटीएडी सचिवालयात त्यांनी काही काळ काम पहिले होते. त्यातूनच त्यांची १९८७ आणि १९९० या काळात जीनिव्हा येथील साउथ कमिशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. त्यांनी १९७१ साली वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली व त्यांचा सरकारमध्ये प्रवेश झाला. त्यातूनच १९७२ साली त्यांची अर्थमंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी अर्थमंत्रालयात भूषविलेल्या



अनेक महत्वाच्या पदांमध्ये अर्थ मंत्रालयाचे सचिवपद, नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद, रिझर्व बँकेचे गव्हर्नरपद, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद आदी पदांचा समावेश होतो. १९९१ पासून राज्यसभा या वरिष्ठ सभागृहात त्यांनी खासदारपद भूषविले होते. १९९८-२००४ च्या दरम्यान त्यांनी राज्यसभेत विरोधी पक्ष नेत्याची भूमिकाही पार पडली आहे. २२ मे २००४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकानंतर त्यांनी पहिल्यांदा व २२ मे २००९ रोजी त्यांनी दुसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानल्या जाणाऱ्या १९९१-१९९६ या पाच वर्षांच्या काळात त्यांनी भारताचे अर्थ मंत्रिपद भूषविले. भारताच्या आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष धोरण तयार करण्यात त्यांची भूमिका जगभरात नावाजली जाते. हा काळ त्यांच्या नावाशी घट्ट जोडला गेला. त्यांच्या कारकीर्दीत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अनेक महत्वाच्या पुरस्कारांपैकी भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण पुरस्कार (१९८७), भारतीय विज्ञान काँग्रेस मध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्म शताब्दी सन्मान (१९९५), अर्थ मंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अवार्ड (१९९३ व १९९४), केम्ब्रिज विद्यापीठाचा ॲडम स्मिथ पुरस्कार (१९५६), केम्ब्रिजमधील सेंट जॉन महाविद्यालयात उल्लेखनीय कार्याबद्दल 'राईट पुरस्कार' असे काही विशेष पुरस्कार आहेत. याशिवाय जपान निहोन कायझाई शिम्बून सारख्या अनेक संस्थांनी डॉ. मनमोहनसिंग यांना सन्मानित केले आहे. केम्ब्रिज व ऑक्सफोर्ड सारख्या अनेक विद्यापीठांकडूनही त्यांना मानद पदवी प्रदान करण्यात आली होती. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि संघटनांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले असुन १९९३ मध्ये सायप्रस येथे राष्ट्रकुल प्रमुखांच्या बैठकीत आणि व्हिएन्ना येथे मानवाधिकारावरील जागतिक परिषदेत भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले.

'द ॲक्सिडेंटल प्राइम मिनिस्टर' या चित्रपटात अनुपम खेर यांनी मनमोहनसिंहांची भूमिका केली होती. या सिनेमात काँग्रेसवर आणि गांधी घराण्यावर टीका केलेली असल्याने या सिनेमाच्या प्रदर्शनाला काँग्रेस पक्षाने विरोध केला होता. तसेच 'प्रधानमंत्री' या नावाची एक मालिका एका टी.व्ही चॅनेलवर प्रसारित झाली होती. गेल्या ६५ वर्षात १३ पंतप्रधानांच्या कार्यकाळात देशात झालेले बदल मांडण्याचा हा अनोखा प्रयत्न होता. त्यातील काही भागात मनमोहन सिंग यांची देखील कथा चित्रित केली गेली होती.

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे अत्यंत शांत, विनम्र आणि मितभाषी व्यक्तिमत्व होते. देशाच्या अर्थव्यवस्थेला सावरण्याची त्यांची क्षमता होती, हे त्यांनी अर्थमंत्री असताना दाखवून दिले होते. त्यांची अर्थतज्ज्ञ म्हणून कामगिरी जागतिक दर्जाची होती. त्यांच्या निधनाने भारत देशाची मोठी हानी झाली आहे. देशाने एक जागतिक दर्जाचा अर्थतज्ज्ञ विद्वान गमावला आहे. अर्थविश्वाचा भारतीय कोहिनूर हरपला आहे. त्यांचा शांत विनम्र स्वभाव आणि अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांची विद्वत्तेचा अमीट ठसा भारतीय राजकारणावर नेहमीच कायम राहील. वयोमानाशी संबंधीत आजारांवर उपचारादरम्यान शर्थीचे प्रयत्न करुनही त्यांचे प्राण वाचू शकले नाही आणि शेवटी २६ डिसेंबर २०२४ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली, अशा या महान नेत्याला विनम्र, भावपूर्ण आदरांजली !

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## स्मार्ट सहेली उपक्रम आयोजन; १३९ क्रमांकाचा महिलांनी करा वापर



**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.२८, डोंबिवली (ठाणे)** : मध्य रेल्वे सुरक्षा बल मुंबई यांच्या अंतर्गत असलेले डोंबिवली रेल्वे सुरक्षा बल वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली स्मार्ट सहेली कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या आयोजनामध्ये डोंबिवली महिला ग्रुप अॅडमिन शिवानी ठाकुर्ली ग्रुप अॅडमिन कामिनी आणि कोपर ग्रुप एडमिन संध्या यांना स्मार्ट सहेली ग्रुप कंट्रोलिंग महिला ऑफिसर पिंकी आणि सुरेखा यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. या सर्व महिलांना सुरक्षा बलाचे महिला शिपाई सुरक्षा बाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर रेल्वे सुरक्षा बलाचे १३९ क्रमांक वर महिलांनी काही अडचण आलास त्यांना तातडीने मदत मिळण्याची माहिती देण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये आलेले महिला ग्रुप अॅडमिन यांनी आपल्या समस्या रेल्वे सुरक्षा बलाचे वरिष्ठांना सांगून या संदर्भात चर्चा ही करण्यात आले व रेल्वे सुरक्षा बल किती सक्षम आहे याची मदत आपण कधी ही प्रवासादरम्यान घेऊ शकता असे विश्वास देण्यात आले. आलेले सर्व महिला वर्गाने डोंबिवली सुरक्षा बलाचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊतांची हे कार्यक्रम आयोजन केल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले.

## रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार उपेंद्र शेंडे यांचे निधन



**अक्षराज: भानुदास गायकवाड**

**दि.२८, डोंबिवली (ठाणे) :** रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार उपेंद्र शेंडे यांचे निधन झाल्याची दुर्दैवी बातमी समोर आली आहे. त्यांच्या निधनाने रिपब्लिकन चळवळीसोबतच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात एक अपूरणीय क्षती झाली आहे. उपेंद्र शेंडे चळवळीतील एक निष्ठावंत नेते शेंडे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत समाजाच्या उत्थानासाठी वंचित आणि शोषित वर्गाच्या न्यायासाठी अखंड काम केले. रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीशी ते शेवटपर्यंत अखंडपणे जोडलेले होते. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक उपक्रम आणि योजनांना नवा आयाम मिळाला. भावपूर्ण श्रद्धांजली शेंडे यांच्या निधनाबद्दल अनेक नेत्यांनी दुःख व्यक्त केले असून, त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना अनेक नेत्यांनी केली आहे. उपेंद्र शेंडे यांच्या योगदानाची आठवण नेहमी प्रेरणादायी राहील आणि त्यांच्या कार्यामुळे ते समाजाच्या स्मृतीत अजरामर राहतील.

## भाजपा संघटन पर्व महाराष्ट्र प्रभारी पदी आ.चव्हाण यांची नियुक्ती



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२८, डोंबिवली (ठाणे) :** भारतीय जनता पार्टीने संघटन पर्वाच्या महत्त्वपूर्ण जबाबदारीसाठी महाराष्ट्र प्रभारीपदी माजी मंत्री व आमदार रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या नेतृत्वातील कौशल्य आणि पक्षासाठी समर्पित कार्याचा विचार करून हा निर्णय घेतल्याचे पक्षाने जाहीर केले आहे. आ.रवींद्र चव्हाण यांचे पक्षांतर्गत उत्तम नेतृत्व तसेच प्रशासनातील व्यापक अनुभव त्यांच्या नियुक्तीसाठी महत्त्वाचे ठरले आहे. संघटन पर्वाच्या माध्यमातून पक्ष मजबूत करताना भाजपच्या विचारधारेचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्वाचे काम त्यांच्या खांद्यावर असणार आहे. भाजप कार्यकर्त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा या ऐतिहासिक नियुक्तीबद्दल भाजप कार्यकर्ते आणि त्यांच्या समर्थकांनी आ. रवींद्र चव्हाण यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, पक्षाच्या वाढीसाठी ते महत्त्वपूर्ण योगदान देतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ही नियुक्ती आगामी काळात पक्ष संघटनेसाठी अत्यंत निर्णायक ठरेल आणि भाजपची महाराष्ट्रातील उपस्थिती अधिक बळकट करेल, असा विश्वास पक्ष श्रेष्ठींनी व्यक्त केला आहे.

## सुपा एमआयडीसीतील कामगारांची सुरक्षितता रामभरोसे
### सुपा येथील कंपनीला आग प्रकरणी व्यवस्थापनच जबाबदार - रविश रासकर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर)** : पारनेर तालुक्यातील सुपा जुन्या एम आयडीसीमध्ये व्हीजी कार्बन ही कंपनी आहे. या कंपनीला दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी भिषण आग लागली. या कंपनीला सेफ्टी कोणतीही यंत्रणेसह कोणत्याही प्रकारची आग नियंत्रण यंत्रणा कक्ष उपलब्ध नसल्याने आगीने रौद्ररूप धारण केले. याला सर्वस्वी कंपनी व्यवस्थापन जबाबदार असल्याचे मनसेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष रविश रासकर यांनी सांगितले. आग लागल्यानंतर बाहेरून अग्निशमन गाडी बोलाविण्यात आली. गाडी येईपर्यंत खूप वेळ झाला आणि ही आग एवढी भयानक होती की, शेजारीच केमिकलची कंपनी आहे. जर त्या कंपनीला या आगीची झळ लागली असती तर भयानक स्फोट झाला असता आणि होणाऱ्या जिवितहानीस जबाबदार कोण ? त्यामुळे अशा घटना वारंवार होऊ नये, यासाठी मनसे नेते रासकर यांनी तहसीलदार, उपअभियंता अहिल्यानगर एमआयडीसी कार्यालय,नवनागापूर आणि जिल्हाधिकारी, यांना निवेदनाद्वारे कंपनीवर कारवाईची मागणी केली आहे. अशा घटना पुन्हा घडू नये. म्हणून रबरच्या आणि टायर कार्बनच्या जेवढ्या कंपन्या असतील त्यांचे ऑडिट करून ज्या बेकायदेशीर टायर कंपन्या आहेत. त्या कंपन्या त्वरित सील करण्यात याव्यात. ज्या कंपनीमध्ये कामगारांसाठी सुरक्षा नसेल अशा कंपन्यांचे परवाने रद्द करण्यात यावे. अन्यथा आंदोलन किंवा उपोषण करण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने रविश रासकर यांनी दिला आहे.

# पारनेरमध्ये नगरसेवकाची दादागिरी, ट्रस्टीला बेदम मारहाण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील पारनेर येथे नगरसेवकाने गणपती देवस्थान ट्रस्टच्या जमिनीच्या वादातून ट्रस्टीला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे.

गणपती देवस्थानच्या जमिनीवरील अतिक्रमण काढण्या संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी केल्याच्या रागातून पारनेर नगरपंचायतचे नगरसेवक युवराज पठारे आणि इतरांनी देवस्थान समितीचे सदस्य सुनील चौधरी यांना



बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात युवराज पठारे, नामदेव पठारे, यशवंत पठारे, कुंडलिक पठारे आणि इतर ७ ते ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुपा रोडवरील गणपती देवस्थानच्या जागेवर पठारे कुटुंबियांनी केलेले अतिक्रमण काढावे. म्हणून २०१८ मध्ये देवस्थानच्या ट्रस्टींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर सुनावणी होऊन न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पारनेर नगरपंचायतीकडे अतिक्रमण काढण्या संदर्भामध्ये नोटीस पाठवल्या होत्या. ७ दिवसांपूर्वी नगरपंचायतच्यावतीने अतिक्रमण धारकांनाही नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.

याचाच पाठपुरावा करण्यासाठी देवस्थानचे सदस्य सुनील चौधरी हे नगरपंचायतमध्ये गेले असता तिथे येत नगरसेवक युवराज पठारे आणि इतरांनी चौधरी यांना उचलून नेले आणि घरी जाऊन बांबूने आणि लाथाबुक्याने बेदम मारहाण केली, अशी फिर्याद दाखल करण्यात आली आहे. दरम्यान या घटनेने पारनेर तालुक्यातील एकच खळबळ उडाली आहे.

# वाहनाच्या धडकेत लोखंडी पोल वाकल्याने वाहतुकीस अडथळा
## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२८, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरवासियांसाठी अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेला भुयारी रेल्वे मार्ग अखेर एक वर्षापूर्वी सुरू करण्यात आला. यामुळे रेल्वे गेट वर होणारी वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटला. तसेच शहरातील दोन्ही भागांना जोडण्याचे काम या मार्गामुळे झाले. परंतु या मार्गाने वर्दळ असल्याने जड व उंच वाहने जाऊ नये. याकरीता संबंधित विभागाने लोखंडी पोल लावले व जास्त उंचीची व जड वाहने या मार्गाने जाऊ नये याची काळजी घेतली. तसेच शहरालगत रेल्वे मार्गावर अजून एक पर्यायी उड्डाण पुल असताना टिप्पर, टेम्पो याच मार्गाने प्रवास करण्याचा प्रयत्न करीत असतात.



याच अनुषंगाने दि.२७ डिसेंबर रोजी सकाळी एका जड वाहनाने या लोखंडी पोलला धडक दिली. यामुळे या मार्गावरील वाहतूक दिवसभर खोळंबली होती.

त्यामुळे आज दिवसभरात या भुयारी मार्गाने प्रवास करणारे दुचाकी स्वार, पायी चालत जाणारे नागरिक, विद्यार्थी आपला जीव मुठीत घेऊन या पोलच्या खालून जात होते. संध्याकाळी एक मोटारसायकलस्वार लोखंडी पोल खालुन जात असताना तो लोखंडी पोल त्या मोटारसायकल स्वराच्या डोक्याला लागायच्या आतच तो सावरला नसता अपघात झाला असता अशा घटना घडत आहेत पण सार्वजनिक बांधकाम विभागाने या घटनेकडे दुर्लक्ष केले आहे.

दोन दिवसांपासून पोल वाकलेल्या अवस्थेत आहे. पण अद्याप ही याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेतली नाही. स्थानिक प्रशासनाच्या वतीने अशा मोठ्या वाहनांना या भुयारी मार्गाने रहदारीस अटकाव करुन शहरालगत असलेल्या बायपास उड्डाणपुलावरून आपली वाहने नेण्यासाठी सूचना द्याव्यात. अशी मागणी शहर वासियांतून होत आहे.

# कन्हेरवाडी येथील वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे आयोजन

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.२८, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी येथे श्री.शिव छत्रपती वाचनालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा दि.१ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध सांस्कृतिक कार्यक्रम व उपक्रम घेवून साजरा करण्यात येणार असल्याची माहिती ग्रंथालयाचे संचालक प्रा.विलास जगताप यांनी सांगितले.

तसेच शासन परिपत्रक प्रमाणे दि.२९ डिसेंबर २०२४ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रम घेण्यात येणार असून दि.२६ जानेवारी २०२५ रोजी विजेत्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र व बक्षीसही मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहेत. अशी माहिती प्रा.जगताप यांनी दिली आहे. या उपक्रमात ग्रंथालयाची स्वच्छता करण्यात येणार आहे तसेच दोन दिवस ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार असून वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच लेखक व विद्यार्थी यांच्यात वाचन-संवाद कार्यक्रम घेण्यात येणार आहे. यासाठी ग्रंथवाचन, परिसंवाद, चर्चासत्र, व्याख्यान इत्यादी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. त्यानंतर सर्व कार्यक्रम विशेष करून शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणार आहेत. तरी या सर्व कार्यक्रमात महिला, युवती, युवक, जेष्ठ नागरीक सहभागी होऊ शकतात.

तसेच या उपक्रमात सहभागी झालेल्यांना दि.२६ जानेवारी २०२५ रोजी कार्यक्रमात सहभाग घेणाऱ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार आहे. विजेत्यांना प्रोत्साहन प्रमाणपत्र व बक्षीस देण्यात येणार आहे या सर्व कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी फक्त मौजे कन्हेरवाडी गावासाठीच हा उपक्रम मर्यादीत आहे.

तरी या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी, युवक, युवती, महिला, जेष्ठ नागरीक यांनी सहभागी व्हावे. वाचन संस्कृती बळकट करण्यासाठी आपले योगदान सहभागाच्या माध्यमातून द्यावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष निवृत्ती भाऊ जगताप आणि सर्व संचालक मंडळ व ग्रंथालय कर्मचारी यांनी केले आहे.

# मस्साजोग प्रकरणी पोलिसांकडून मुख्य आरोपी मोकाट; शासनाचे अपयश - स्वप्निल जाधव

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२८, उदगीर (लातूर) :** उदगीर बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुका केज येथील सरपंचाची हत्या होऊन १९ ते २० दिवस होत आले. तरी अद्याप मुख्य आरोपी होणारच आहेत. ही गोष्ट जशी पोलीस प्रशासनाला लाजिरवाणी आहे. तसेच ती सरकारला देखील अकार्यक्षम ठरवणारी आहे. सरकारने युद्ध पातळीवरून या प्रकरणाचा शोध करण्याचे आदेश द्यावेत आणि मराठवाड्यामध्ये पसरलेला असंतोष दूर करावा. अशी मागणी युवा नेते स्वप्निल जाधव यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

मस्त जोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे पहिल्यांदा अपहरण केले गेले. त्यानंतर त्यांची अत्यंत क्रूरपणे हत्या झाली. याप्रकरणी काही आरोपींना पोलिसांनी पकडले असले



तरी मुख्य आरोपी अजूनही मोकाट आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये राज्य कायद्याचे आहे की गुंडाचे आहे असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे.

एका बाजूला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जाहीरपणे कोणालाही सोडणार नाही. सर्वांना शिक्षा होईल असे सांगितले असले तरीही प्रत्यक्षात मात्र तपासामध्ये शून्य प्रगती असल्याची टीका बीड जिल्ह्यामध्ये सर्वच जण करत आहेत. मात्र पोलीस प्रशासन या गोष्टीकडे कानाडोळा करत आहे.

सामान्य माणसाला जर न्याय मिळत नसेल तर हे राज्य कायद्याचे आहे असे म्हणता येणार नाही असेही विचार स्वप्नील जाधव यांनी सदर निवेदनामध्ये नमूद केले आहेत.बीड जिल्ह्यामध्ये प्रचंड दहशत निर्माण झाले असून अनेक गुन्हेगारांना पोलीस प्रशासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे आशीर्वाद तर नाहीत ना असाही प्रश्न आता उपस्थित केला जात असल्याची टीका स्वप्नील जाधव यांनी उपस्थित केले आहेत. कारण जिल्ह्यातील अनेक प्रकरणे हे प्रलंबित असून पोलीस प्रशासन अधिक तपास चालू नाहे.

अशा गोंड शब्दात सर्व काही गुंडाळून टाकत असल्याची ती काही युवा नेते स्वप्निल जाधव यांनी केली आहे.या संदर्भात आमदार धस यांनी खूप गंभीरपणे आरोप केले आहेत.

त्यांनी तर मागील काळामध्ये पालकमंत्री पद हे भाड्याने दिले होते की काय? असा प्रश्न पंकजा मुंडे यांनी उपस्थित केला होता असे सांगून अजूनही परिस्थिती तीच आहे की काय असेही बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य माणूस बोलू लागला आहे. ही परिस्थिती बदलून सामान्य माणसाला विश्वास बसेल अशा पद्धतीचा तपास आणि मुख्य आरोपीला अटक करून शासनाने कर्तबगारी दाखवावी.

कारण जोपर्यंत मुख्य आरोपी मोकाट आहेत. तोपर्यंत या प्रकरणावर पोलीस प्रशासन आणि शासन यांच्यावर कायम टीका होत राहील याप्रकरणी पोलीस खात्यातील वरिष्ठांनी आणि शासन स्तरावर मुख्यमंत्र्यांनी व्यक्तिशः लक्ष देणे गरजेचे असल्याचे ही स्वप्निल जाधव यांनी नमूद केले आहे.

# अनधिकृत बांधकामाविरोधात नेरुळ विभागात कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, नेरुळ (नवी मुंबई) :** उच्च न्यायालयाचे वेळोवेळी आदेशानुसार नवी मुंबई महानगर पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत १) उदय झिटे, एलएल- १/ बी- ४६/४, से.१०, नेरूळ, नवी मुंबई, २) नामदेव मसल, एलएल- १बी- ४६/५, से.१०, नेरूळ, नवी मुंबई, ३) विकास केसरवाणी, एलएल- १बी- ४२/१२, से.१० नेरूळ, नवी मुंबई यांचे सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता अंदाजे ३.७५ मी. ÷ ७.७० मी. मोजमापाचे जी+४ आरसीसी बांधकाम अनधिकृतरित्या करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर अनधिकृत बांधकाम धारकाला अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये दि.१०/१२/२०२४ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापी नोटीशीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविण्यात आले नाही. सदर कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, १० मजूर, १ गॅस कटर, ४ ब्रेकर च्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे.

